# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 05/07/2021 (सोमवार)

(दुपार)

---

## जाती विषयक शिवीगाळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 9 कि. मी अंतरावर मौजा ईसापुर शेत शिवार येथे दिनांक 04/07/2021 चे 10:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– श्रीमती अनुसया नत्थुजी डोंगरे, रा. ईसापूर ता. मौदा यांचे शेताला लागून आरोपी नामे– शंकर मद्रासी, रा. ईसापूर यांचे शेत आहे. तसेच फिर्यादीचे नातेवाईक शकुंतला शंकर डोंगरे यांचे शेत आरोपी हा बटाई ने वाहत असून दोघांच्या शेताच्या मधात 10.6 फुटाचा धुरा आहे. त्या धु–यावरून फिर्यादीचे ट्रैक्टर, बंडीचे रस्ता असुन धु–यावर मध्यभागी कंपाउंड टाकुन आरोपीचे वाहत असलेल्या शेताचे मालकाने गेट लावुन बंद केल्याने मा. तहसीलदारांच्या आदेशाने यातील नमुद घटना ता व ठिकाणी यातील फिर्यादीने कंपाउंड आणि गेट जे.सी.बी. ने तोडले असता यातील आरोपी शंकर मद्रासी याने जातीवाचक शिवीगाळी करून ''तुम्हाला या रस्त्याने जाउ देणार नाही तुम्ही कुंपन गेट तोडा आम्ही बनवत जावु'' असे म्हणुन फिर्यादीची पुतनी व मुलगा नामे प्रकाश नत्थुजी डोंगरे यांना जातीवाचक बोलुन जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम सहकलम 3(1) आर, 3(1) एस अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. 1989. सहकलम 504, 506 भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी कन्हान विभाग श्री मुख्तार बागबान हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर